25/09/2024

Pr 25/9/24

पुण्य नगरी ३

बुधवार, २५ सप्टेंबर २०२४

# विद्यार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्यावा : दिवाण

## विवेकानंदमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत



कोल्हापूर : स्वागत कार्यक्रमात विद्यार्थ्यांना रोप भेट देताना मान्यवर.

कोल्हापूर : प्रतिनिधी

नावीन्याची क्षमता अभियंत्यांनी समजून घेतली पाहिजे. नावीन्यपूर्ण उत्पादनांचा विकास करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या सर्व योजनांचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे प्रतिपादन इंद्रदीप ऑटोचे मॅनेजिंग पार्टनर देवेंद्र दिवाण यांनी केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या 'स्वागत समारंभ'प्रसंगी ते बोलत होते.

सामाजिक बांधिलकी जपताना इन्स्टिट्यूटतर्फे प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या ६०० हून अधिक विद्यार्थ्यांना रोप भेट देण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी शासनाच्या विविध शिष्यवृत्ती, परीक्षा योजना, विविध अधिविभाग, इन्स्टिट्यूटद्वारे राबवले जाणारे उपक्रम, संस्थास्तरीय शिष्यवृत्तीची माहिती दिली.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सावित्रीबाई फुले कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य डॉ. विशाल पोवार, रजिस्ट्रार अमित आव्हाड, समन्वयक प्रा. रोहन पाटील, प्रा. हेमंत शिंदे आदी उपस्थित होते. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रा. अशोक कोळेकर, प्रा. आरती चव्हाण यांनी केले. प्रा. सुदर्शन महाडिक यांनी आभार मानले.

तरुण भारत
बुधवार, २५ सप्टेंबर २०२४



कोल्हापूर : दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांबरोबर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रबंधक रघुनाथ जोग आदी.

# विवेकानंदच्या छात्रांचा दिल्ली कॅम्पमध्ये सहभाग

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील खालील तीन छात्रांची दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झाली होती. ज्युनिअर अंडर ऑफिसर सेला रेंगे, बी.एस्सी. बायोटेक भाग ३ हिने हेल्थ ॲण्ड हायजिन व टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सहभागी झाली होती. सेला रेंगे हिला टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सुवर्णपदक मिळाले. थल सैनिक कॅम्पसाठी निवड झालेल्यांमध्ये सिनिअर अंडर ऑफिसर चेतन पवार, बी.कॉम.भाग ३ व सार्जण्ट सार्थक कुलकर्णी १२ वी आर्टस याची फायरींग इव्हेंटसाठी निवड झाली होती. वरील तीनही छात्र थल सैनिक कॅम्प् दिल्ली यशस्वीरित्या पूर्ण करुन परत आले. याबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या सौ शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गांवडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. या छात्रांना ५ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे, ६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. यावेळी प्रबंधक रघुनाथ जोग उपस्थित होते.

25/09/2024

25/9/2024